| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHYA-1900-1113-2023 | दाखल दिनांक | : | २१/०८/२०२३ | | |
| | नोंदणी दिनांक | : | २१/०८/२०२३ | | |
| | निकाल दिनांक | : | १४/०८/२०२६ | | |
| | कालावधी | : | व | म | दि |
| | | | ०२ | ११ | २४ |

## भाग – 'अ'– न्यायनिर्णय

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, राळेगाव, जि. यवतमाळ यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – श्री. उमेशचंद्र एम. पाटील)**
**न्यायनिर्णय अदिघोषित दिनांक – १४/०८/२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्र. १४१/२०२३** **निशाणी क्र. ४९.**
**गु. र. क्र. १३८/२०२३** **पोलीस स्टेशन, राळेगांव**

| | | | |
|---|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन तर्फे,**<br>पोलीस स्टेशन, **राळेगांव**,<br>ता. राळेगाव, जि. यवतमाळ | |
| **अभियोग पक्षातर्फे** | | वि. सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. ए. इंगळे | |
| **आरोपी** | | **१.** | **प्रशांत रविंद्र खाडे**<br>वयः ३४ वर्षे, धंदाः मजुरी,<br>रा. कारला रोड, शिवराव वाडी, वार्ड क्र.४,<br>पिंपरी मेघे, वर्धा, ता. जि. वर्धा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २. | **रविंद्र निळकंठ खाडे (मयत)** |
| | | ३. | **वत्सला रविंद्र खाडे,**<br>वयः ५७ वर्षे, धंदाः मजुरी,<br>रा. कारला रोड, शिवराव वाडी, वार्ड क्र.४,<br>पिंपरी मेघे, वर्धा, ता. जि. वर्धा |
| | | ४. | **अक्षय रविंद्र खाडे,**<br>वयः २७ वर्षे, धंदाः मजुरी,<br>रा. कारला रोड, शिवराव वाडी, वार्ड क्र.४,<br>पिंपरी मेघे, वर्धा, ता. जि. वर्धा |
| | | ५. | **शुभांगी उर्फ राणी एकनाथ खाडे,**<br>वयः २० वर्षे, धंदाः मजुरी,<br>रा. कारला रोड, शिवराव वाडी, वार्ड क्र.४,<br>पिंपरी मेघे, वर्धा, ता. जि. वर्धा |
| **आरोपीतर्फे विधिज्ञ** | | एस. आर. शेंडे. | |

## भाग – 'ब'

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्रमांक ४४(II) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | दि. ०१/०४/२०१ ते ०५/०४/२०२३ या कालावधीत |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०५/०४/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | २१/०८/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ३०/०९/२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १४/०८/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | १४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | १४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षे संदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक<br>**आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रशांत रविंद्र खाडे | सूचनापत्रावर सोडण्यात आले | ११/०३/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ व ५०४ सह कलम ३४. | – | – | – |
| २. | रविंद्र निळकंठ खाडे (मयत) | सूचनापत्रावर सोडण्यात आले | ११/०३/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ व ५०४ सह कलम ३४. | – | – | – |
| ३. | वत्सला रविंद्र खाडे | सूचनापत्रावर सोडण्यात आले | ११/०३/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ व ५०४ सह कलम ३४. | – | – | – |
| ४. | अक्षय रविंद्र खाडे | सूचनापत्रावर सोडण्यात आले | ११/०३/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ व ५०४ सह कलम ३४. | – | – | – |
| ५. | शुभांगी उर्फ राणी एकनाथ खाडे | सूचनापत्रावर सोडण्यात आले | ११/०३/२०२४ | भा. दं. सं. चे कलम ४९८–अ व ५०४ सह कलम ३४. | – | – | – |

## भाग – 'क'

## (फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद क्रमांक ४४(III) अन्वये)

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | मोनाली प्रशांत खाडे | फिर्यादी | **नि. क्र. ४७** |
| २ | वनिता रामदास जुनघरे | साक्षीदार | **नि. क्र. ४८** |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

### क. न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| – | – | – | – |

## अभियोग पक्षातर्फे/बचाव पक्षातर्फे/ न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| – | – | – |

### ब. बचाव पक्षातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| – | – | – |

## क. न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | दस्त वर्णन | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | दोषारोपपत्र | १ |

## भाग – 'ड'

## अभिलेखावरील मुद्देमाल

| अ. क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

## न्या य नि र्ण य

(पारीत दिनांक १४ ऑगस्ट, २०२६)

आरोपी क्र. १ व ३ ते ५ हे भा. दं. सं. चे कलम ४९८–अ आणि ५०४ सह कलम ३४ प्रमाणे दंडनीय खटल्यांच्या संपरीक्षेस सामोरे गेले आहेत. प्रस्तुत खटला प्रलंबीत असतांना आरोपी क्र. २ नामे रविंद्र निळकंठ खाडे यांचा मृत्यू हा दि. ०५/०४/२०२५ रोजी झाला. त्यामुळे निशाणी क्र. १ खाली आदेश पारित करुन सदर खटला त्यांच्याविरुद्ध संपुष्टात आणण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,**

**०२.** दि. ०१/०४/२०२१ ते दि. ०५/०४/२०२३ या काळात मौजे कारला रोड, शिवराम वाडी, वार्ड क्र. ४, पिंपरी मेघे, वर्धा, ता. जि. वर्धा व शांती नगर, राळेगांव, ता. राळेगांव, जि. यवतमाळ येथे आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरसनार्थ फिर्यादीकडे शेती घेण्याकरीता एक लाख रुपयाची मागणी करुन सदर मागणीचया पुर्ततेकामी तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. तिच्या चारित्र्यावर संशय घेतला आणि तिला शिवीगाळ

केली.

०३. फिर्यादी यांचे फिर्यादवरुन पोलीस ठाणे, राळेगांव, ता. राळेगाव, जि. यवतमाळ येथे आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ४९८–अ व ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास ना. पो. कॉ. २१७०, नितीन गेडाम, पोलीस ठाणे, राळेगांव यांचेकडे सुपूर्त करण्यात आला. गुन्ह्याचे तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा तसेच फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. सर्व तपास पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

०४. संपरिक्षेदरम्यान नि. क्र. २१ नुसार आरोपींच्या विरुध्द भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवले. दोषारोपामधील मजकूर आरोपींना त्यांचे भाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपींनी त्यांना गुन्हा कबूल नाही असे निवेदन दिले आणि प्रकरणाची संपरीक्षा करण्याची विनंती केली.

०५. आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाने फक्त दोन साक्षीदाराची साक्ष नोंदविली. फिर्यादी व साक्षीदार यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नसल्यामुळे सहाय्यक सरकारी वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन नि. क्र. १ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०६. सरकार पक्षाच्या पुराव्यांमध्ये कोणतीही गुन्हादर्शक परिस्थिती निर्माण झाली नसल्याचे आढळून आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदवण्यात आला नाही.

०७. अभियोग पक्षाने सादर केलेला पुरावा पाहता व दोन्ही बाजुचा युक्तिवाद

लक्षात घेता, या खटल्याचे न्यायनिर्णयाकामी खालील मुद्दे उपस्थित होतात. मी ते खालील कारणमिमांसेद्वारे निष्कर्षास काढत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. ०१/०४/२०२१ ते दि. ०५/०४/२०२३ या काळात मौजे कारला रोड, शिवराम वाडी, वार्ड क्र. ४, पिंपरी मेघे, वर्धा, ता. जि. वर्धा व शांती नगर, राळेगांव, ता. राळेगांव, जि. यवतमाळ येथे आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरसनार्थ फिर्यादीकडे शेती घेण्याकरीता एक लाख रुपयाची मागणी करुन सदर मागणीचया पुर्ततेकामी तिचा शारिरीक व मानसिक छळ केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| २. | आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरसनार्थ वर नमूद कालावधीत व ठिकाणी फिर्यादीस शिवीगाळ करुन अपमानीत केले तसेच त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागचा उद्देश होता, असे सरकार पक्ष सिध्द करतो काय ? | नाही |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशानुसार |

## कारणमीमांसा

०८. आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करणेसाठी सरकार पक्षाने वर नमूद दोन साक्षीदारांना तपासलेले आहे.

**मुद्दे क्र. ०१ व २ करीता –**

०९. फिर्यादी साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, ती आरोपींना ओळखते. त्यांनी पुढे असे सांगितले की, लग्नानंतर आरोपींनी त्यांच्यासोबत किरकोळ वाद केला. त्यामुळे त्यांनी रागाच्या भरात आरोपींविरुद्ध रिपोर्ट दिला. फिर्यादी यांनी फिर्यादवर त्यांची सही असल्याचे सांगून त्यातील मजकूर माहीत नसल्याचे स्पष्टपणे कथन केले. तसेच साक्षीदार वनिता जुनघरे सा.क्र. २ यांनी घटनेबाबत त्यांना काहीही माहित नाही असे सांगितले. अशाप्रकारे फिर्यादी व सा. क्र. २ यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केले नाही. त्यामुळे वि. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाचे परवानगीने सदर फिर्यादीला व सदर साक्षीदाराला उत्तरसूचक प्रश्न विचारले परंतु अभिलेखावर अभियोगपक्षास उपयुक्त ठरेल अशा कोणत्याही बाबी आल्या नाहीत.

१०. अभिलेखावर आलेल्या एकूण पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी सा. क्र. १ जे या प्रकरणामध्ये महत्वाचे साक्षीदार आहेत त्यांनीच आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरसनार्थ त्यांच्याकडे शेती घेण्याकरीता एक लाख रुपयाची मागणी करुन सदर मागणीचया पुर्ततेकामी त्यांचा शारिरीक व मानसिक छळ केल्याबाबत, त्यांच्या चारित्र्यावर संशय घेतल्याबाबत आणि त्यांना आरोपींनी शिवीगाळ केल्याबाबत त्यांच्या साक्षीमध्ये काहीही सांगितले नाही. याकामी उपरोक्त पुराव्यांवरुन दि. ०१/०४/२०२१ ते दि. ०५/०४/२०२३ या काळात मौजे कारला रोड, शिवराम वाडी, वार्ड क्र. ४, पिंपरी मेघे, वर्धा, ता. जि. वर्धा व शांती नगर, राळेगांव, ता. राळेगांव, जि. यवतमाळ येथे आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुरसनार्थ फिर्यादीकडे शेती घेण्याकरीता एक लाख रुपयाची मागणी करुन सदर मागणीचया पुर्ततेकामी तिचा शारिरीक व मानसिक छळ केल्याचे, तिच्या चारित्र्यावर संशय घेतल्याचे आणि तिला शिवीगाळ केल्याचे स्पष्टपणे कुठेही दिसून येत नाही. अभियोग पक्षाने आरोपींवर ठेवण्यात आलेला गुन्हा शाबीत

करणेसाठी सबळ व विश्वासार्ह प्रत्यक्ष किंवा परिस्थितीजन्य पुरावा सादर केला नाही. उपलब्ध पुरावा आरोपींचा गुन्हा सिध्द करण्यास पुरेसा नाही. तथापि, अभियोग पक्षाने आरोपींचा गुन्हा सर्व वाजवी संशयापलिकडे जाऊन सिध्द केला नाही. **म्हणून मी मुद्दा क्र. ०१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.**

**मुद्दा क्र. ०३ बाबत** –

**११.** न्यायालयासमोर सरकार पक्षाने सादर केलेल्या पुराव्यांचे अवलोकन केले असता आरोपींविरुध्द लावलेले दोषारोप सरकार पक्षाने सिध्द केले नाहीत. म्हणून सबळ पुराव्या अभावी आरोपी क्र. १ व ३ ते ५ हे त्यांच्यावर ठेवण्यात आलेले भारतीय दंड संहितेचे कलम ४९८–अ आणि ५०४ सह कलम ३४ अन्वये दंडनीय अपराधांच्या आरोपांतून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. **म्हणून मुद्दा क्र. ०३ चे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.**

## आदेश

१. **आरोपी क्र. १ आणि ३ ते ५** यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे **कलम ४९८–अ व ५०४ सह कलम ३४** या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे वैयक्तिक जातमुचलका व जामीनकदबा रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) अन्वये मा. वरिष्ठ न्यायालयाची अपील नोटीस आल्यानंतर तेथील न्यायालयात हजर राहाण्याकरीता आरोपी क्र. १ आणि ३ ते ५ यांनी प्रत्येकी रक्कम रु.

१५,०००/- चे जामीन बंधपत्र व तितक्याच रकमेचा वैयक्तिक जातमुचलका द्यावा असा आदेश सदर आरोपी क्र. १ आणि ३ ते ५ यांना देण्यात येतो.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदीत व घोषित करण्यात आला.)

Digitally signed by PATIL UMESHCHANDRA MADHAVRAO
Date: 2026.08.14 17:45:29 +0530

**स्थळ** – राळेगाव
**दिनांक** –१४/०८/२०२६

**(यु. एम. पाटील)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राळेगाव,
जि. यवतमाळ.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

a) **Name of the Stenographer** :- R. R. Hardiya.

b) **Court** :- Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Ralegaon.